# भारतीय परराष्ट्र धोरणात पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान व भूमिका

**डॉ. संजय गोरे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदुर, जि. चंद्रपुर ४४२९०८
मोबाईल क्र. ९२२६११६५४० sanjaygore.1462@rediffmail.com

---

**सारांश**

पंडित नेहरूंच्या नवभारताच्या जडणघडणीबरोबरच भारताच्या परराष्ट्र धोरणावर स्पष्टपणे प्रभाव पडल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य प्राप्तीच्या पूर्वी म्हणजे परराष्ट्र विभागाच्या स्थापनेपासून ते स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९४६ पर्यंत भारताचा परराष्ट्र विभाग हा पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली होता. या दरम्यानच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया घालण्याचे महत्वपूर्ण कार्य पं. नेहरूंनी केले. म्हणूनच त्यांना 'भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हटल्या जाते'.

पंडित जवाहरलाल नेहरूंचा भारताचे स्वातंत्र्य आंदोलन तसेच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था आदींवर प्रभाव पडल्याचे दिसून येते. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया व्यापक बनविण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.धर्मनिरपेक्ष राज्य, लोकशाही समाजवाद, राष्ट्रवाद, मिश्र अर्थव्यवस्था, पंचवार्षीक योजना, समाजातील दूर्बल घटकांचा विकास व उद्योगधंद्यांच्या निर्मितीवर भर इत्यादी घटकांच्या माध्यमातून नवभारताच्या निर्मितीचे कार्य पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न पं. नेहरूंनी केला आहे. म्हणून पं. नेहरूंना 'आधूनिक भारताचे शिल्पकारः असे म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय शांततेची स्थापना करणे हे पं. नेहरूंच्या चिंतनाचा मूळ विषय होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतीक शांततेचा सातत्याने पुरस्कार केला होता. पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताने जागतीक शांतता स्थापण्याच्या कार्यात वेळोवेळी संयुक्त राष्ट्राला सहकार्य केले आहे. मानवजातीच्या कल्याणासाठी शांततेची आवश्यकता आहे. यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्राच्या उद्देशांवर पं. नेहरूंची नितांत श्रध्दा होती. पं. नेहरूंनी जागतीक समस्या सोडविण्यासाठी नैतिक सिध्दांताचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला.

आंतरराष्ट्रीय पातळीवर शीतयुध्दाच्या सत्तासंघर्षामूळे तिसऱ्या महायुध्दाचा उडणारा भडका रोखण्याचे कार्य पं. नेहरूंनी केले आहे. पं. नेहरूंनी संयुक्त राष्ट्राच्या व्यासपीठावरून जागतीक शांतता, निःशस्त्रीकरण, साम्राज्यवादाला विरोध, वंशवादाला विरोध, सामुहिक सुरक्षा, तिसऱ्या जगाचे प्रश्न आणि संयुक्त राष्ट्राचे सशक्तीकरण इत्यादी तत्वांचा पुरस्कार केला.

**प्रस्तावना**

आधुनिक काळात परराष्ट्र धोरण या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. कारण आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही सर्व देशांना परस्परांच्या संपर्कात येण्यास किंवा परस्परांशी संबंध ठेवण्यास भाग पाडत आहे. परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात राष्ट्रीय हिताची संकल्पना ही अत्यंत महत्वाची मानली जाते, कारण राष्ट्रीय हित हे प्रत्येक राज्याच्या परराष्ट्र धोरणाचा मुळ उद्देश किंवा साध्य असते. या उद्देशात प्रामुख्याने परकिय आक्रमणापासून सुरक्षा, प्रादेशिक अखंडता, देशातील जनतेच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, औद्योगिक उन्नती, आर्थिक समृध्दी व सर्वांगीण विकास इ. घटकांचा समावेश होतो.

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने विचार केल्यास असे लक्षात येते की, भारताला प्राचीन काळापासूनच उत्कृष्ट अशा परराष्ट्र विषयक विचारांची परंपरा लाभली आहे. प्राचीन भारतात वैदिक व उत्तर वैदिक कालखंडात मांडण्यात आलेल्या राजकीय विचाराबरोबरच परराष्ट्रीय धोरणाबाबत सखोल विचार मांडल्याचे दिसून येते.

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या पैकी एक महत्वपुर्ण नांव म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू होय. इ.स. १९२७ साली युरोप दौऱ्यात ब्रुसेल्सच्या वसाहतवादविरोधी परिषदेला भारतीय राष्ट्रीय कांग्रेसचे प्रतिनिधी म्हणून पं. नेहरूंना सहभागी होण्याची संधी मिळाली यामूळे पं. नेहरूंची आतरराष्ट्रीय ख्यातीचे नेते म्हणून प्रतिमा निर्माण होण्यास याच ब्रुसेल्सच्या परिषदेपासून सुरूवात झाली. पं. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय व परराष्ट्रविषयक प्रश्नांबाबत मांडलेल्या विचाराला जागतीक पातळीवर कांग्रेसचा आवाज मानला जाऊ लागला.

पं. नेहरूंच्या जीवनात लाहोर कांग्रेस अधिवेशनाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या अधिवेशनामूळे पं. नेहरू भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या केंद्रस्थानी आले. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे नेतृत्व नव्या सरकारसमोर प्रचंड अशी आव्हाने व समस्या होत्या. या आव्हान व समस्यांचा सामना करत त्यांनी आपल्या विचारातून आणि योगदानातून नवभारताचा पाया घातला.

**भारतीय परराष्ट्र धोरणात पं. नेहरूंचे योगदान व भूमिकाः**

भारताने सुरूवातीपासून व्यापक धोरणातून शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. कारण की, भारत हे शांतताप्रेमी, लोकशाहीप्रधान व मानवतावादी मुल्य जपणारे राष्ट्र आहे. भारत—पाकिस्तान यांच्यातील काश्मीरचा प्रश्न हा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न मानला जातो. पं. नेहरूंच्या काश्मीरविषयक धोरणावर टिका केली जाते. सुरूवातीपासूनच पं. नेहरू काश्मीरचे भारतात विलिनीकरणासाठी अनुकूल होते. द. आशियात भारताच्या भौगोलिक स्थानाची जाणीव होती. तसेच भारताच्या दृष्टीने अफगाणीस्थान, चीन व सोव्हियत रशिया यांना जोडण्यासाठी काश्मीरचे असलेले भू—राजकीय महत्व याची जाणीव होती.

काश्मीरवर पाकिस्तानने आक्रमण केल्यानंतर महाराजा हरीसिंगांनी विलिनीकरणावर स्वाक्षरी केली. पं. नेहरूंनी काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी सार्वमताची अट मान्य केली, यावर टिका केली जाते. मात्र पं. नेहरू व तत्कालीन भारतीय नेत्यांचा हा प्रश्न संयुक्त राष्ट्रात मांडण्यामागचा उद्देश होता की, पाकिस्तान हे राष्ट्र धर्मवादी, हिंसक राष्ट्र आहे. याउलट भारत हे राष्ट्र सुसंस्कृत, लोकशाहीवादी व शांतताप्रिय आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवरील शीतयुध्दाच्या राजकारणामूळे भारतासमोर दोन्ही महासत्तातील गटा—तटाच्या राजकारणाचे आव्हान निर्माण झाले होते. दोन्ही महासत्तांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी व तत्कालीन राष्ट्रीय हिताची आवश्यकता म्हणून पं. नेहरूंनी अमेरिकेशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र देशाचे हित व जागतीक शांतता याबाबत तडजोउ केली नाही.

साम्यवादी क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटलांवर महासत्ता म्हणून सोवियत रशियाच्या उदयास सुरूवात झाली. पं. नेहरू सुरूवातीपासून सोवियत रशियाशी मित्रत्वाचे संबंध ठेवण्यास आग्रही होते. स्टॅलिननंतरच्या कालखंडात भारत—सोवियत रशियाचे मैत्री संबंध वाढण्यास सुरूवात झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील काश्मीर प्रश्न आणि गोवा मुक्तीचा प्रश्न या दोन प्रश्नांबाबत सोवियत रशियाने भारताची खंबीरपणे पाठराखण केली. तसेच भारताचा विकास व्हावा यासाठी भारताला भरघोस आर्थिक व तंत्रज्ञानात्मक मदत केली. एकंदरीत पं. नेहरूंनी दोन्ही महासत्तांशी संबंध प्रस्थापित करताना देशाच्या हिताला सर्वोच्च प्राथमिकता दिली.

शेजारील देशांसोबत मित्रत्वाचे संबंध या तत्वानूसार आणि आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापीत व्हावी या उद्देशाने पं. नेहरूंनी सातत्याने चीनशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. पं. नेहरूंनी चीनपुढे नेहमी मैत्रीचा हात पूढे केला. त्याचाच एक भाग म्हणजे पंचशील कराराद्वारे तिबेटवरील चीनच्या सार्वभौमत्वाला भारताने संमती दिली. मा. आक्रमक व विस्तारवादी चीनने हा पंचशील करार पायदळी तूडवत इ.स. १९६२ साली भारतावर आक्रमण केले. यात भारताला मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. यामूळे पं. नेहरूंच्या चीनविषयक धोरणावर टिका केली जाते. तर काही अभ्यासक या धोरणाचे समर्थनही करतात. स्वातंत्र्यपूर्व काळात कांग्रेसने आतरराष्ट्रीय घटना घडामोडींबाबत मांडलेल्या ठरावातून आशियाई एकतेच्या विचाराला चालना मिळाली. पं. नेहरूंनी दुसऱ्या महायुध्दानंतर तत्कालीन समस्येचा सामना करण्यासाठी आशियाई एकतेच्या विचाराचा पुरस्कार केला.एकंदरीत पं. नेहरूंचे तिसऱ्या जगाच्या बांधणीतील योगदान महत्वपूर्ण मानले जाते. त्यांनी दुसऱ्या महायुध्दानंतर आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांना एकतेच्या सुत्रात बांधण्याचे कार्य केले. या नवस्वतंत्र राष्ट्रांचा आवाज बुलंद व्हावा या दृष्टीने त्यांना अलिप्ततावादाच्या व्यासपीठावर एकत्र आणण्याचे कार्य केले.

पं. नेहरूंनी आपल्या विचार व कार्याने भारताचे परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित कले आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिर्घकाळ मार्गदर्शक ठरणाऱ्या उद्दिष्टांची व मुलभूत सिध्दांताची पायाभरणी केली. यात प्रामुख्याने अलिप्ततावाद, पंचशिल सिध्दांत, साम्राज्यवाद व वसाहतवादाचा विरोध जागतीक शांततेचा पुरस्कार, नि:शस्त्रीकरणाला पाठिंबा राष्ट्रकुलाचे सदस्यत्व व तिसऱ्या जगाची बांधणी इ. चा उल्लेख करता येईल.२१ व्या शतकात सुरूवातीस जागतीक पातळीवरील सत्ता ही आशिया खंडाकडे सरकताना दिसत आहे. त्याचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे वाढलेले महत्व होय, याचे श्रेय भारताच्या परराष्ट्र धोरणाला जाते.

आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सशक्तीकरणासंबंधी पं. नेहरूंची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे.

**➢संदर्भग्रंथ**

१. अशोक भाऊराव नाईकवाडे भारताचे परराष्ट्र धोरण स्टडी सर्कल पब्लिकेशन मुंबई
२. किशोर बेडकिहाळ (संपा.)वेध नेहरू विचार विश्वाचा शब्द पब्लिकेशन मुंबई २०१५
३. ग. ना. जोशी (संपा.) जवाहरलाल नेहरूंचे तत्वचिंतन मॅजिस्टीक प्रकाशन मुंबई १९९०
४. चंद्रशेखर दिवान भारताची विदेश निती विद्या प्रकाशन नागपूर १९९२
५. जिवन पवार (संपा.)पं. जवाहरलाल नेहरूंचे अल्फा पब्लिकेशन सामाजिक आर्थिक व नांदेड २०११
६ राजकिय विचारशैलेंद्र देवलनकर भारत आणि जग : भारताचे सकाळ प्रकाशन परराष्ट्र धोरण पुणे २०१४
७. शशीकांत नार्वेकर पं. जवाहरलाल नेहरू लोकवाड.मय गृह व्यक्तीमत्वाचा शोध मुंबई १९९४